**प्रेसनोट दि.१७/०४/२०१९**

आज दि.१७/०४/२०१९ रोजी राष्ट्रीय पोलीस ॲकेडमी,हैद्राबाद येथील प्रोबेशनरी आय.पी.एस. अधिकारी बॅच क्रमांक ७१ मधील छत्तीसगड, गुजरात, मालदिव, महाराष्ट्र, मध्य प्रदेश या कॅडरच्या एकुण २७ प्रोबेशनरी आय.पी.एस. अधिकारी यांनी लोकसभा निवडणुक-२०१९ चे प्रक्रीये बाबत माहितीचे अनुषंगाने पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर येथे भेट दिली. सदर भेटीचे दरम्यान मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी सदर अधिकारी यांना निवडणुक प्रक्रीये मधील वेग-वेगळे पैलु, निवडणुक प्रक्रीयेच्या वेग-वेगळया टप्प्यावर पोलीस विभागाकडुन करावयाची कायदेशीर कार्यवाही तसेच निवडणुक प्रक्रीयेतील पोलीस विभागाचे कर्तव्याबाबत निवडणुक प्रक्रीया ही शांततेत व व्यवस्थीत पार पाडण्यासाठी आपण काय कार्यवाही करायची, तसेच अधिकारी म्हणुन आपली जबाबदारी काय आहे याबाबत योग्य ते मार्गदर्शन केले. तसेच सदर काही प्रोबेशनरी आय.पी.एस. अधिकारी यांनी निवडणुक प्रक्रीये संदर्भात विचारलेल्या प्रश्नांचे व शंकेचे निरसन केले.

सदर वेळी मा.पोलीस उप-आयुक्त, परि.४,श्री.प्रसाद अक्कानवरू, मा.पोलीस उप-आयुक्त, परि.३,श्री.मंगेश शिंदे, मा.पोलीस उप-आयुक्त, परि.२,श्री.बच्चन सिंग, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.शिरीष सरदेशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,श्रीमती.स्वप्ना गोरे असे उपस्थित होते.



